CNRMHAH1900 2056 2022

**रे मु नं. ५५०/२०२२ मध्ये नि. ३६ वर आदेश**
( गौरव बबन भालेराव वि. बबन बाबू भालेराव )

वादीने सदरचा अर्ज सी.पी.सी ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाखल केला आहे. वादीने अर्जात असे कथन केले आहे की, दावा वाटपासाठी, पोटगीचा बोजा दावा मिळकतीवर ठेवण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. दावा दाखल करताना प्रतिवादी क्र. १ च्या नावे असलेल्या संपूर्ण मिळकतीचे वर्णन नजरचूकीने दाखल करायचे राहून गेले आहे. त्यामूळे दाव्यात मौजे ब–हाणपूर ता. शेवगाव येथील गट क्र.११४/१ यापैकी सामाईकातील ०हे ४३आर आकार ०.५५ क्षेत्र दाव्यात सामील करण्याचे राहून गेले आहे. तरी खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी. गट क्र. ५३/१ खाली नवीन

मौजे ब–हाणपूर ता. शेवगाव येथील शेत जमीन मिळकत.

| गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पै | चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ११४/१ | ०.४३ यापैकी | ०.५५ | रेकॉर्ड प्रमाणे | रेकॉर्ड प्रमाणे | रेकॉर्ड प्रमाणे | रेकॉर्ड प्रमाणे |

यापैकी प्रतिवादी क्र.१ च्या हिश्याची ०हे १४.३३ आर आकार १८.३३ पैसे अशी दुरुस्ती करण्याची परवानगी असावी असे वादीचे म्हणणे आहे.

वादीने पुढे असे कथन केले की, सदर दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने महत्वाची आहे. सदर दुरुस्तीमूळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होत नाही. याउलट दाव्याचा निकाल लावण्यास मदत होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जास म्हणणे देउन हरकत घेतली व कथन केले की अर्ज कायदेशीर नाही. सदरचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी मुद्दामहून दिलेला आहे. अर्जात योग्य ते कारण नमूद केलेले नाही. अर्जातील वर्णन चूकीचे आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. २ यांनी नि. ३९ वर वादीच्या अर्जास म्हणणे देउन हरकत घेतली व कथन केले की प्रतिवादीने दाव्यामध्ये आपली कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादीचा बचाव

खुला झाला आहे. वादीने अनेक मुदती घेतलेल्या आहेत. दाव्याचे कामकाज लांबवण्याच्या दृष्टीने खोटया आशयाचा अर्ज दिलेला आहे. दावा दाखल करातना राहिलेल्या तूटी अशा प्रकारे दुरुस्त करता येणार नाही. सदर दुरुस्तीमूळे दाव्याचे मूळ स्वरुपात बदल होत आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले.

५. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती ही दावा दाखल करताना प्रतिवादी क्र.१ ची मिळकत दाव्यात समाविष्ट करण्याचे राहून गेल्याबाबत आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे नजरचूकीने सदरची मिळकत समाविष्ट करण्याचे राहून गेले आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती स्थावर मिळकतीबाबत आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल लावण्यासाठी सदरची मिळकत दाव्यामध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे. दुरुस्ती न केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होईल. सदर अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल देण्यासाठी त्याची मदतच होणार आहे. वरील विवेचनाच्या अनुषंगाने वादीचा सदरचा अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदर आदेशाप्रमाणे १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी.

RAMESH RAOJI BHADRE
Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE
Date: 2026.03.17 17:32:46 +0530

दि. १७/०३/२०२६
शेवगाव.

(आर. आर. भद्रे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव